# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

## वक्तृत्व व वादविवाद विभाग अहवाल माहिती २०१८-१९

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

वक्तृत्व व वादविवाद मंडळ २०१८-१९

महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग द्वारा आयोजित

## "वक्तृत्व, पोस्टर व निबंध स्पर्धा आयोजन"

- **विषय : "तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम" (तिन्ही स्पर्धेसाठी एकच विषय)**
- स्पर्धेचे नियम :

१. कनिष्ठ, वरिष्ठ, पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना सहभाग घेता येईल.

२. स्पर्धकांनी निबंध ५०० ते ६०० शब्दात लिहून २० ऑगस्टपूर्वी द्यावेत.

२. वक्तृत्व स्पर्धा व्ही.एल.सी. मध्ये दि. २० ऑगस्ट रोजी १०.०० ते १.०० या वेळेत होईल. वेळ ५.०० मी. असेल.

३. याच स्पर्धेद्वारे २०१८-१९ च्या वक्तृत्व व वादविवाद मंडळाचे पदाधिकारी निवडले जातील.

४. सदरील तिन्ही स्पर्धा प्रकारात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेसाठी स्वतंत्र पाच - पाच बक्षिसे दिले जातील. त्यासाठी एकूण ४५ बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात येतील.

५. वक्तृत्व स्पर्धेसाठी ५ मी. वेळ असेल. वक्तृत्व स्पर्धा दि. २० ऑगस्ट रोजी व्ही.एल.सी. हॉल मध्ये सकाळी १०.०० ते १.०० च्या दरम्यान होईल.

६. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी आपली नावे, निबंध व पोस्टर प्रा. बी.बी. पाटील यांच्याकडे वक्तृत्व व वादविवाद विभागात दि. १६ ऑगस्ट पूर्वी द्यावेत.

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

(स्वायत्त)

वक्तृत्व व वादविवाद विभाग

सूचना

दि. ०२.०८.२०१८

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारा आयोजित

## "वक्तृत्व, पोस्टर व निबंध स्पर्धा"

सर्व कनिष्ठ, वरिष्ठ, पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने **राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत** वक्तृत्व, पोस्टर व निबंध स्पर्धेचे आयोजन आपल्या महाविद्यालयात करण्यात आलेले आहे.

वरील तिन्ही स्पर्धेसाठी एकच विषय आहे.

- विषय : "तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम"
- स्पर्धेचे नियम :

१. स्पर्धकांनी निबंध ५०० ते ६०० शब्दात कागदाच्या एकाच बाजुस लिहावा.

२. निबंधाच्या शेवटी नाव, पत्ता, वर्ग, मोबाईल नंबर लिहावा.

३. पोस्टर स्पर्धेसाठी A3 कागदावर चित्र स्वत: काढावे.

४. विद्यार्थ्यांनी आपले निबंध व पोस्टर **२० ऑगस्ट पर्यंत** प्रा. बी.बी. पाटील यांचेकडे वक्तृत्व व वादविवाद विभागात दुपारी १२.०० त १.०० या वेळेत आणून द्यावेत.

५. वक्तृत्व स्पर्धेसाठी **५ मी.** वेळ असेल. वक्तृत्व स्पर्धा **दि. २० ऑगस्ट रोजी VLC** हॉल मध्ये सकाळी **१०.०० ते १.००** च्या दरम्यान होईल.

६. वक्तृत्व स्पर्धेतील अनुक्रमे पहिल्या पाच विद्यार्थ्यांची **'वक्तृत्व व वादविवाद'** मंडळाचे पदाधिकारी म्हणून निवड केली जाईल.

७. वरील तिन्ही स्पर्धा प्रकारात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेसाठी स्वतंत्र बक्षिसे दिले जातील. त्यासाठी **४५ बक्षिसे व प्रमाणपत्रे** देण्यात येणार आहेत.

८. अधिक माहितीसाठी प्रा. बी.बी. पाटील (वक्तृत्व व वादविवाद विभाग) यांच्याशी संपर्क साधावा.

चेअरमन

वक्तृत्व व वादविवाद विभाग

प्राचार्य

०२/०८/१८

D/2018-19 (PC-2)/Notice/Student Notice (28)

अभिनंदन!　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　अभिनंदन!!

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## सहयोग युवक महोत्सव, नांदेड

## वादविवाद स्पर्धेचे

## *सांघिक 'सुवर्णपदक' 'शाहु'ला*

१) कृष्णा धोंडिराम काथवटे - बी.ए. तृतीय

२) आशा ज्ञानेश्वर फत्तेपुरे - एम.ए. द्वितीय

विषय : सरकारची शेतविषयक धोरणे शेती आणि शेतकऱ्यांच्या हिताची आहेत/नाहीत. (वेळ : ०७ मी.)

या विषयावर प्रभावी वादविवाद करून 'वादविवाद स्पर्धेचे' 'सुवर्णपदक' मिळविल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

दिनांक : २५ सप्टेबर, २०१८

मार्गदर्शन
प्रा.भीमराव पाटील
वक्तृत्व व वादविवाद मंडळ

प्राचार्य
डॉ. महादेव गव्हाणे

# राजर्षी शाहू महाविद्यालय व एन.एस.यू.आय. लातूर

## यांच्या संयुक्त विद्यमाने

## २ जानेवारी हा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे स्मृतिदिन आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त

८ जानेवारी २०१९

वर्ष पहिले २०१९

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा



## वक्तृत्व नेतृत्त्वाचा पाया आहे

:: वक्तृत्व स्पर्धेचे विषय ::

- जलसंवर्धनात माझी भूमिका.

: संयोजन समिती :

**डॉ. ई.यू. मासुमदार** — उपप्राचार्य
**डॉ. ए.जे. राजू** — उपप्राचार्य
**प्रा. विलास कांबळे** — उपप्राचार्य

**प्रा. सुचेता वाघमारे** — पर्यवेक्षिका

**प्रा. भीमराव पाटील** — चेअरमन, वक्तृत्व व वादविवाद मंडळ
**कृष्णा काथवटे** — अध्यक्ष, वक्तृत्व व वादविवाद मंडळ

**ॲड. शरद देशमुख** — जिल्हाध्यक्ष, एन.एस.यू.आय
**प्रा. सूर्यकांत चव्हाण** — सदस्य
**प्रा. सायली समुद्रे** — सदस्य

: स्पर्धा संपर्क समिती :

१. प्रा भीमराव पाटील : ९८५०७९६७५५
२. ॲड.शरद देशमुख : ९५६१८३२९६१
३. कृष्णा काथवटे : ८६००६४६११०

: स्पर्धेचे ठिकाण :

## राजर्षी शाहू महाविद्यालय

व्ही.एल.सी. सभागृह, लातूर.

दिनांक व वेळ : मंगळवार ८ जानेवारी २०१९ सकाळी ९.०० वा.

: प्रेषक :

**डॉ.एम.एच. गव्हाणे**
प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
फोन : ०२३८२-२४५९३३, फॅक्स : २५३६४५
Website : www.shahucollegelatur.org.in
E-mail : principal@shahucollegelatur.org.in

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) व एन.एस.यू.आय., लातूर

यांच्या संयुक्त विद्यमाने

२ जानेवारी विठ्ठल रामजी शिंदे स्मृतिदिन आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा



प्रति
प्राचार्य, ____________________
______________________________
______________________________

वक्तृत्व नेतृत्वाचा पाया आहे

मा. प्राचार्य,
स.न.वि.वि.

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासाचे विलक्षण वेड असते. ध्येयवादी युवक जिद्दीने आणि मोठ्या जाणीवेने आपल्या व्यक्तिमत्वाचे कंगोरे खुलविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतात. स्वतःमधील सुप्तगुणांचा विकास करण्यासाठी विद्यार्थी सतत धडपड करतात.

सध्याचे युग खऱ्या अर्थाने स्वतःला व्यक्त करण्याचे आहे. संवाद व भाषा कौशल्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा निर्माण होतो. विद्यार्थ्यांनी ज्वलंत विषयावर सखोल चिंतन करुन आपली मते समाजासमोर मांडावीत, ते वाक्कौशल्यकलेत पारंगत व्हावेत म्हणून आम्ही हे विचारपीठ उपलब्ध करुन देत आहोत. समाजात विविध क्षेत्रात नेतृत्व करणारे भावी युवक घडणे ही काळाजी गरज आहे. युवकांच्या विचारशक्तीला उत्तेजना मिळून महाराष्ट्राचा बौद्धिक आणि वैचारिक वारसा अधिक समृद्ध व्हावा म्हणून आम्ही नववक्त्यांना त्यांच्या हक्काचं विचारपीठ या वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून उपलब्ध करुन देत आहोत. तरी आपल्या महाविद्यालयातील एक किंवा दोन विद्यार्थ्यांचा संघ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाठवून सहकार्य करावे, ही विनंती.

*''वक्त्याच्या ठायी वाणीचं माधुर्य,*
*विचाराचं सौंदर्य, शब्दाचं सामर्थ्य,*
*ग्रंथ वाचनाचं वेड, भाषेचं प्रभुत्व*
*आणि आचाराचं चारित्र्य पाहिजे.''*

।। वक्तृत्व ज्ञानाची पाणपोई असते ।।

**स्पर्धेचे नियम व अटी :**

१. ही स्पर्धा महाराष्ट्रातील कनिष्ठ व पदवी, पदव्युत्तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता असेल.
२. प्रत्येक स्पर्धकास ५ + २ = ७ मिनिटांचा वेळ दिला जाईल.
३. स्पर्धकाजवळ महाविद्यालयाचे ओळखपत्र, आधार कार्ड व प्रवेशपत्र असणे आवश्यक आहे.
४. स्पर्धा सकाळी ठीक ९.०० वाजता सुरु होईल.
५. स्पर्धकाचे वय २३ वर्षापेक्षा अधिक नसावे.
६. प्रत्येक स्पर्धकास १०० रुपये प्रवेश शुल्क आकारण्यात येईल.
७. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
८. प्रत्येक महाविद्यालयासय एक किंवा दोन स्पर्धक पाठवता येईल.
९. ऐनवेळी स्पर्धेच्या नियमात बदल करण्याचा हक्क संयोजन समितीला राहील.
१०. नियमीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यानाच या स्पर्धेत भाग घेता येईल. मुक्त विद्यापीठ आणि दूर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही.
११. स्पर्धकांनी ५ जानेवारी २०१९ पर्यंत संयोजकाकडे नाव नोंदणी करावी.

**वक्तृत्व स्पर्धेचे विषय :**

१. समाजसुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
२. नकोत पुतळे थोरांचे, सद्गुण त्यांचे अनुसरावेत..
३. जलसंवर्धनात माझी भूमिका
४. ऐसे कैसे झाले भोंदू ...
५. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी

: पारितोषिके :

| | |
|---|---|
| प्रथम : | ५००० रु., शाहू करंडक व प्रशस्तीपत्र |
| द्वितीय : | ३००० रु., स्मृती चिन्ह व प्रशस्तीपत्र |
| तृतीय : | २००० रु., स्मृती चिन्ह व प्रशस्तीपत्र |
| उत्तेजनार्थ : | १००० ची दोन पारितोषिके, स्मृती चिन्ह व प्रशस्तीपत्र (कनिष्ठ गटासाठी एक राखीव) |

2018-19

वक्तृत्व वाद विवाद विभाग

## शाहू महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

लातूर - राजर्षी शाहू महाविद्यालय व एनएसयुआय यांच्या संयुक्त विद्यमाने महर्षि विठ्ठल रामजी शिंदे स्मृतिदिन आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त ८ जानेवारी रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत जास्तीत जास्त महाविद्यालयांनी आपले संघ पाठवावेत, असे आवाहन प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ.ए.जे. राजू, ई.यु. मासुमदार, प्रा. विलास कांबळे, पर्यवेक्षिका प्रा. सुचेता वाघमारे, प्रा.बी.बी. पाटील, कृष्णा कायवटे, ॲड. शरद देशमुख यांनी केले आहे.

सकाळ हिंगोली नांदेड, रविवार, १० फेब्रुवारी २०१९

TODAY

f SakalNews | @esakalupdate | www.esakal.com Call Center : 9225800800



कुरुंदा : येथील नरहर कुरुंदकर विद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व, समूहनृत्य स्पर्धेचे शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत उदघाटन झाले.

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन

कुरुंदा, ता. ९ (बातमीदार) : वसमत तालुक्यातील कुरुंदा येथील नरहर कुरुंदकर विद्यालयातर्फे नरहर कुरुंदकर स्मृतीदिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उदघाटन शनिवारी (ता.नऊ) मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

या कार्यक्रमास पंचायत समितीचे सभापती चंद्रकांत दळवी पाटील, निरंजन इंगोले पाटील, संस्थेचे सचिव मुंजाजी इंगोले, विश्वनाथराव दळवी, दत्तराम इंगोले, प्रकाश इंगोले, सहायक पोलिस निरीक्षक शंकर वाघमोडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक मुरलीधर भुसे यांची उपस्थिती होती.

दरवर्षी नरहर कुरुंदकर स्मृती सोहळ्यानिमित्त दोन दिवस राज्यस्तरीय वक्तृत्व व समूहनृत्य स्पर्धा घेण्यात येतात.

वक्तृत्व स्पर्धेत ४२ संघांनी सहभाग नोंदवला आहे. परीक्षक म्हणून बालाजी नाईक, प्रा.भीमराव पाटील, प्रा. धाराशिव शिराळे यांनी काम पाहिले दरम्यान, रविवारी (ता. दहा) समूह नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य बी. बी. कदम यांनी केले आहे.

लातूर Next
पुरोगामी विचाराचे एकमत
लातूर ▸ गुरुवार, दिनांक १० जानेवारी २०१९

# पुण्याचा राहुल गिरी ठरला वक्तृत्व स्पर्धेचा मानकरी

लातूर : प्रतिनिधी

येथे पार पडलेल्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व करंडक स्पर्धेत पुण्याच्या कर्वे समाज विज्ञान महाविद्यालयाच्या राहूल गिरी प्रथम क्रमांक, व्दितीय सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणेच्या निकीता पाटीलने पटकावला, तर के.ग.जोशी कला महाविद्यालय, ठाणेच्या एकनाथ गोपाळ यांनी तृतीय पारितोषीक मिळवले.

राजर्षी शाहू महाविद्यालय व एन.एस.यु. आय. यांच्या संयुक्त विद्यमाने

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे विषय 'समाज सुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे', 'नकोत पुतळे थोरांचे, सद्गुण त्यांचे अनुसरावेत', 'जलसंवर्धनात माझी भूमिका', 'ऐसे कैसे झाले भोंदू', 'अभिव्यक्ति स्वातंत्र्याची गळचेपी' असे होते. यात प्रथम क्रमांक पुण्याच्या राहूल गिरी ने पटकावला. त्याला करंडक, पाच हजार, प्रमाणपत्र.

द्वितीय क्रमांक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यार्थीनी निकीता पाटील हिने पटकावला. तीन हजार, स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र देण्यात आले. तृतीय क्रमांकाचे पारितोषीक के. ग. जोशी कला महाविद्यालय, तर ठाण्याचा एकनाथ गोपाळ याने पटकाविले. दोन हजार, स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर च्या पल्लवी हाके, प्रदिप अडसूळ यांना प्रत्येकी एक हजार रूपये उत्तेजनार्थ देण्यात आले. या स्पर्धेसाठी राज्यभरातील संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव शशिकांत हिंगोणेकर यांनी केले. अध्यक्षस्थानी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील होते.

महामानवांचे पुतळे उभारण्यापेक्षा त्यांचे विचार समाजात रूजवणे

▸पान ८ वर

## पुण्याचा राहूल गिरी ठरला...

महत्वाचे आहे. हे विचार वक्तेच प्रभावीपणे समाजात रूजवू शकतात. असे त्यांनी सांगितले. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी वक्तेच महत्वाची भूमिका निभावत असतात. असे अष्टपैलू वक्ते महाविद्यालयातून घडले पाहिजेत. असे गोपाळराव पाटील यांनी मत व्यक्त केले. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषीक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ...राजू, डॉ. ई.यु. मासुमदार यांच्या हस्ते करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेचे परिक्षण डॉ. भास्कर बडे प्रा. मकरंद गिरी यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य विलास कांबळे, पर्यवेक्षिका प्रा. सुनेता वाघमारे, वक्तृत्व वादविवाद मंडळाचे प्रमुख प्रा. भीमराव पाटील, एन.एस.यु.आय. चे जिल्हाअध्यक्ष ॲड. शरद देशमुख, प्रा.सुर्यकांत चव्हाण, प्रा. सायली समुद्रे, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय दळवी, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. विकास वाघमारे, डॉ. गोविंद उफाडे, कृष्णा काशवटे यांनी पुढाकार घेतला होता.

कोल्हापूर । अकोला । गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित
www.facebook
लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
औरंगाबाद, रविवार, दि. १३ जानेवारी २०१९

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत पुण्याच्या राहुल गिरीने पटकाविले पहिले बक्षीस

## शिवाजी महाविद्यालयाचा विशाल द्वितीय, 'शाहू'चा कृष्णा तृतीय

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात आयोजित लोकनेते विलासराव देशमुख स्मृती चषक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत पुण्यातील कर्वे समाजसेवा संस्थेच्या राहुल महादेव गिरी या विद्यार्थ्याने रोख २५ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक पटकाविले. रोख रक्कम व स्मृती चषक असे पारितोषिकाचे स्वरूप होते.

बाभळगाव येथील कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात परभणी येथील शिवाजी महाविद्यालयाच्या विशाल विजयकुमार देशमुख या विद्यार्थ्याने रोख २० हजार व स्मृती चषक पटकाविले, तर लातूरच्या राजर्षि शाहू महाविद्यालयाच्या कृष्णा श्रीहरि कावळे हा तृतीय आला. रोख १५ हजार रुपये व स्मृति चषक देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. तसेच या स्पर्धेमध्ये औरंगाबादच्या जयप्रकाश नारायण अध्यापक महाविद्यालयाच्या भरत अर्जुनसिंग सिद्धनोंगे व गंगाखेडच्या श्री संत जनाबाई कला वाणिज्य महाविद्यालयाच्या कुणाल रामेश्वर मुंडे यांनी उत्तेजनार्थ रोख दोन हजारांचे पारितोषिक मिळविले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे तसेच दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख, दीपशिखा देशमुख यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभात पाहुण्यांनी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या वक्तृत्व आणि अभ्यासू नेतृत्वावर भाष्य केले. विद्यार्थ्यांनी वक्तृत्व कला समाजाच्या उन्नतीसाठी विकसित करावी, असे आवाहन केले.

सकाळ | लातूर औरंगाबाद, गुरुवार, १० जानेवारी २०१९

TODAY

f SakalNews | t @esakalupdate | www.esakal.com Call Center : 9225800800

सकाळ » TODAY



लातूर : राजर्षी शाहू महाविद्यालयातर्फे आयोजित महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व करंडक स्पर्धेतील बक्षीस वितरणप्रसंगी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, डॉ. ई. यू. मासुमदार, डॉ. भास्कर बडे, प्रा. मकरंद गिरी व अन्य.

# विठ्ठल रामजी शिंदे वक्तृत्व स्पर्धेत पुण्याचा राहुल गिरी प्रथम

## पुण्याची निकिता द्वितीय; ठाण्याचा गोपाळ तृतीय

लातूर, ता. ९ (बातमीदार) : राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या वतीने आयोजित महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व करंडक पुण्याच्या कर्वे समाज विज्ञान महाविद्यालयाचा राहुल गिरी याने पटकाविला. पुण्याच्याच सावित्रीबाई फुले विद्यापीठाची निकिता पाटील हिने द्वितीय तर ठाण्याच्या के. ग. जोशी कला महाविद्यालयाच्या एकनाथ गोपाळ याने तृतीय पारितोषिक मिळविले. शाहू महाविद्यालय व एनएसयूआयच्या वतीने या स्पर्धा घेण्यात आल्या. 'समाज सुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे', 'नकोत पुतळे थोरांचे', 'सद्गुण त्यांचे अनुसरावेत', 'जलसंवर्धनात माझी भूमिका', 'ऐसे कैसे झाले भोंदू', 'अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी' हे स्पर्धेचे विषय होते. स्पर्धकांसाठी पाच हजार, तीन हजार व दोन हजार रुपये असे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षीस होते. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पुण्याच्या राहुल गिरी ने पटकाविले. त्यास करंडक आणि रोख रुपये पाच हजार व प्रमाणपत्र देण्यात आले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या पल्लवी हाके आणि प्रदीप अडसूळ यांना प्रत्येकी एक हजार रुपयांचे उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. लातूर विभागीय मंडळाचे सचिव शशिकांत हिंगोणेकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू व डॉ. ई. यू. मासुमदार यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. भास्कर बडे व प्रा. मकरंद गिरी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेसाठी उपप्राचार्य विलास कांबळे, पर्यवेक्षिका प्रा. सुनेत्रा वाघमारे, वक्तृत्व-वादविवाद मंडळाचे प्रमुख प्रा. भीमराव पाटील, एन. एस. यू.आय.चे जिल्हाध्यक्ष ॲड. शरद देशमुख, प्रा. सूर्यकांत चव्हाण, प्रा. सायली समुद्रे, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय दळवी, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. विकास वाघमारे, डॉ. गोविंद उफाडे, कृष्णा कावळे यांनी पुढाकार घेतला.

मराठवाडा नेता

१९ २ संमिश्र

# राज्यस्तरीय वक्तृत्व करंडक पुण्याच्या गिरीने पटकाविला

लातूर, दि. ९ :.... महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व करंडक पुण्याच्या कर्वे समाज विज्ञान महाविद्यालयाच्या राहूल गिरी याने पटकाविला. तर दुसरा क्रमांक सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणेच्या कु. निकीता पाटील हिने पटकाविला. के.ग.जोशी कला महाविद्यालय, ठाणेच्या एकनाथ गोपाळ यांनी तृतीय पारितोषीक मिळवले. राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) आणि एन.एस.यु.आय. यांच्या संयुक्त विद्यमाने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



स्पर्धेचे विषय समाज सुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, नकोत पुतळे थोरांचे, सद्गुण त्यांचे अनुसरावेत..., जलसंवर्धनात माझी भूमिका, ऐसे कैसे झाले भोंदू..., अभिव्यक्ति स्वातंत्र्याची गळचेपी असे होते. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पुण्याच्या राहूल गिरीने पटकावले. त्यास करंडक आणि रोख रुपये पाच हजार व प्रमाणपत्र देण्यात आले. द्वितीय क्रमांक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यार्थीनी कु. निकिता पाटील हिने पटकाविला. तिला रोख रुपये तीन हजार स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. तृतीय क्रमांकाचे पारितोषीक के. ग. जोशी कला महाविद्यालय, ठाणे येथील विद्यार्थी एकनाथ गोपाळ याने पटकाविले. त्याला रोख रक्कम दोन हजार, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूरच्या पल्लवी हाके आणि प्रदिप अडसूळ या स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपयाचे उत्तेजनार्थ पारितोषीक देण्यात आले. या स्पर्धेसाठी राज्यभरातील संघ सहभागी झाले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव शशिकांत हिंगोणेकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. गोपाळरावजी पाटील होते. उद्घाटन प्रसंगी हिंगोणेकर म्हणाले, महामानवांचे पुतळे उभारण्यापेक्षा त्यांचे विचार समाजात रुजविणे गरजेचे आहे. हे विचार अधिक प्रभावीपणे समाजात रूजू शकतात असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. गोपाळरावजी पाटील म्हणाले, लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी वक्ते महत्वाची भूमिका निभावत असतात. असे अष्टपैलू वक्ते महाविद्यालयातून घडले पाहिजेत.

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषीक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, डॉ. ई.यु. मासुमदार यांच्या हस्ते करण्यात आले. या वक्तृत्व स्पर्धेचे परिक्षण डॉ. भास्कर बडे, प्रा. मकरंद गिरी यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य विलास कांबळे, पर्यवेक्षिका प्रा. सुनेत्रा वाघमारे, वक्तृत्व वादविवाद मंडळाचे प्रमुख प्रा. भिमराव पाटील, एन.एस.यु.आय. चे जिल्हाअध्यक्ष ॲड. शरद देशमुख, प्रा.सुर्यकांत चव्हाण, प्रा. सायली समुद्रे, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय दळवी, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. विकास वाघमारे, डॉ. गोविंद उफाडे, कृष्णा कावळे यांनी परिश्रम घेतले.

लातूर Next
पुरोगामी विचाराचे एकमत
लातूर ▸ रविवार, दिनांक १३ जानेवारी २०१९
३ epaper : http://www.dainikekmat.com/epaper

## कास्ट्राईबची आज विभागीय बैठक

लातूर : महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाची विभागीय आढावा बैठक होत आहे. राज्याचे अध्यक्ष परमेश्वर माटे, राज्य उपाध्यक्ष विलास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक होत आहे. महाराष्ट्र कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या विभागीय बैठकीत मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या विविध खात्यांतील अनुशेष भरती, पदोन्नती, संघटनात्मक बांधणी, महासंघाचे होणारे त्रैवार्षिक अधिवेशन यावर चर्चा होणार आहे. विभागीय, पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अध्यक्ष नागसेन कांबळे, यु. डी. गायकवाड, जी. टी. होसुरकर, जे. एस. उमरगेकर, डॉ. विकास गाजरे, सुधीर साबणे, रामदास दगे, दिलीप जाधव, संजय उबाळे, बालाजी सातपुते, नागसेन कांबळे, बाबा हलकुडे, सुनिता सूर्यवंशी, सचिव किशोर गायकवाड, राम हिंगे, आरती कांबळे, सचिव अनिता जायले यांनी केले आहे.

# विलासरावांसारखे नेते होणे नाही



लातूर : प्रतिनिधी

आतापर्यंत असंख्य मुख्यमंत्री झाले भविष्यातही होतील, परंतु विलासराव देशमुख यांच्यासारखे मोठे नेते होणे कदापि शक्य नाही, असे मत ज्येष्ठ विचारवंत तथा संपादक मधुकर भावे यांनी व्यक्त केले.

बाभळगाव येथील कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त बाभळगाव येथील कै. दगडोजीराव देशमुख सभागृहात 'सोशल मीडिया आणि आजचा युवक' या विषयावर आयोजित राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण दि. १२ जानेवारी रोजी सकाळी झाले. त्या वेळी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ संपादक मधुकर भावे बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार ॲड. त्र्यंबक भिसे होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले, दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य धिरज विलासराव देशमुख, सौ. दीपशिखा धिरज देशमुख, सचिव शाम देशमुख, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज सिरसाट, जिल्हा परिषदेचे सदस्य धनंजय देशमुख, नारायण लोखंडे, रेणापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष लालासाहेब चव्हाण, विलास सहकारी साखर कारखान्याचे संचालक रवींद्र काळे, डॉ. सोपानराव जटाळ यांची उपस्थिती होती.

विलासराव देशमुख हे महाराष्ट्राला पडलेले सुंदरच नव्हे तर कर्तृत्ववान स्वप्न होते, असे नमूद करून मधुकर भावे पुढे म्हणाले की, विलासरावजी यांच्या जाण्याने लातूरचे किती नुकसान झाले ते सोडा पण महाराष्ट्राचे, देशाचे आणि विशेष म्हणजे काँग्रेस पक्षाचे खुप मोठे नुकसान झाले. मनामनातील दिलखुलास व्यक्तिमत्त्व म्हणजे विलासरावजी होते. त्यांच्याकडे असलेला कामाचा उरक, महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या नवनवीन संकल्पना, स्पष्टवक्तेपणा आजच्या राजकारण्यांमध्ये दिसत नाही. माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचा विलासरावजींवर खूप विश्वास होता. मनात कसलाही आणि कोणाविषयीही द्वेष नसलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे विलासरावजी देशमुख होते, असेही ते म्हणाले.

विलासराव देशमुख यांची झलक धिरज विलासराव देशमुख हे भाषण करीत असताना दिसून आली, असे नमूद करून मधुकर भावे धिरज विलासराव देशमुख यांच्याबद्दल म्हणाले की, गेल्या वर्षभरात दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून धिरज देशमुख यांनी केलेले काम पाहता भविष्यात ते खूप मोठे ▶पान ८ वर

### शिक्षण घेत असतानाच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न



स्व. दगडोजीराव देशमुख (दादा) यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे रोपटे लावले. विकासरत्न विलासराव देशमुख यांनी त्या रोपट्याचे जीवापाड संवर्धन केले. माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी ते रोपटे मोठे केले. माजी राज्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या रोपट्याचा विस्तार केला आणि आज त्या रोपट्याचा वटवृक्ष झाला आहे, असे नमूद करून संस्थेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख पुढे म्हणाले की, या संस्थेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनाच्या जडण-घडणीसाठी ज्या ज्या सुविधा हव्या आहेत त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ते साकार करण्याकरिता कठोर परिश्रम घ्यावेत. स्वप्न मरू देऊ नका, प्रयत्न थांबवू नका. जगाची भाषा समजून घेत असताना शिक्षण संस्थेची जबाबदारी वाढत आहे त्यामुळेच संस्थेने आगामी काळात शिक्षण घेत असतानाच विद्यार्थी व विद्यार्थिनींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, असेही ते म्हणाले.

### राहुल गिरी ठरला चषकाचा मानकरी

या स्पर्धेचे पारितोषिक देण्यात आले. राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धामध्ये प्रथम पारितोषिक स्मृती चषक व २५ हजार रुपये - कर्वे समाज सेवा संस्था पुणेचा विद्यार्थी राहुल महादेव गिरी याने, द्वितीय पारितोषिक स्मृती चषक व २० हजार रुपये- शिवाजी महाविद्यालय, परभणी विशाल विजयकुमार देशमुख याने, तृतीय पारितोषिक स्मृती चषक व १५ हजार रुपये- राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूरचा कृष्णा धोंडिराम काथवटे याने तर उत्तेजनार्थ पारितोषिक २ हजार रुपये जयप्रकाश नारायण अध्यापक महाविद्यालय, औरंगाबादचा भरत अर्जुनसिंग रिडलॉन व श्रीसंत जनाबाई कला वाणिज्य महाविद्यालय, गंगाखेडचा कुणाल रामेश्वर बेद्रे यांनी पटकावले.






**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन करताना म.रा.म.ऊ.प्र.मा. शिक्षण मंडळाचे सचिव शशिकांत हिंगोणेकर, शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे**




**अध्यक्षीय समारोप करताना डॉ. गोपाळरावजी पाटील**


।। वक्ता दससहस्त्रेषु ।।
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) व एन.एस.यु.आय. लातूर
यांचे संयुक्त विद्यमाने
२ जानेवारी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतीदिनानिमित्त
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा
मंगळवार, दि. ८ जानेवारी २०१९ स्थळ : VLC हॉल
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
(स्वायत्त)
मराठी भाषा
मराठी विभाग
मराठी भाषा संवर्धन पंधरवडा
राजकुमार फोटो स्टुडिओ, लातूर


।। वक्ता दससहस्त्रेषु ।।
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) व एन.एस.यु.आय. लातूर
यांचे संयुक्त विद्यमाने
२ जानेवारी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतीदिनानिमित्त
विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा
दि. ८ जानेवारी २०१९ स्थळ : VLC हॉल
आयोजक
वक्तृत्व व वादविवाद मंडळ


॥ वक्ता दशसहस्त्रेषु ॥
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) व एन.एस.यु.आय. लातूर
यांचे संयुक्त विद्यमाने
२ जानेवारी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतीदिनानिमित्त
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा
मंगळवार, दि. ८ जानेवारी २०१९
स्थळ : VLC हॉल
आयोजक
वक्तृत्व व वादविवाद मंडळ


राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर.
(स्वायत्त)
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) व एन.एस.यु.आय. लातूर
यांचे संयुक्त विद्यमाने
२ जानेवारी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतीदिनानिमित्त
राजकुमार फोटो स्टुडिओ, लातूर




**कै. विलासरावजी देशमुख वक्तृत्व स्पर्धेचे द्वितीय पारितोषिक कृष्णा काथवटे या विद्यार्थ्यांने पटकाविले त्यांचे अभिनंदन करताना मान्यवर.**




**कै. संभाजीराव बडगीरे वक्तृत्व स्पर्धेचे प्रथम पारितोषिक कु. प्रतिक्षा मोरे हिने पटकाविले तिचे अभिनंदन करताना मान्यवर**




बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालय आयोजित राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे प्रथम पारितोषिक कु. पुजा तनमोर हिने मिळविले तिचे अभिनंदन करताना प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, प्रा. भिमराव पाटील